# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा-२०२२
## प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, प्रकल्प व तत्सम परीक्षा
## कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर
## विशेष मार्गदर्शक सूचना

१. अ) कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर इ.१२ वीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी,प्रकल्प व तत्सम परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे घेण्यात येतील. सदर परीक्षा दि.१४/०२/२०२२ ते दि.०३/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात येतील. प्रयोग वही (जर्नल) उपरोक्त कालावधीत सादर करावी.

महत्वाचे- मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देवू न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.३१/०३/२०२२ ते दिनांक १८/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. Out of Turn चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल त्यामुळे Out of Turn साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही.

ब) विज्ञान, कला, वाणिज्य व व्यावसायिक शाखातील विषयांची श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात येत आहे. त्यामुळे श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन परीक्षा प्रचलित मूल्यमापन आराखडयानुसार तसेच कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावाची परिस्थिती विचारात घेऊन निर्धारित कालावधीत पार पाडावी.

२. कोविड-१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेता बहुतांश उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह सुरू ठेवण्यास कमी कालावधी मिळाल्याने निर्धारित प्रात्यक्षिके पूर्ण करणे शक्य झाले नाही. सदर बाब विचारात घेऊन उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेतंर्गत अंतर्गत मूल्यमापन असलेल्या सर्व विषयांच्या परीक्षेबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.

अ) कोविड-१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेऊन विषयनिहाय प्रात्यक्षिकांची संख्या किमान ४०% करण्यात आलेली आहे.

ब) या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परिक्षक संबंधित उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयातूनच घेण्यात यावेत. ज्या कनिष्ठ महाविद्यालयात एका विषयासाठी एकापेक्षा अधिक विषय शिक्षक उपलब्ध नाहीत तेथे त्याच उपलब्ध विषय शिक्षकाने अंतर्गत व बहिस्थ परिक्षकाचे काम करावे.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व संबंधितांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

४. उपरोक्त कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात यावी. याशिवाय, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर सोबत ठेवावे. तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुद्धा स्वतःसोबत आणावे.

२/२

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) सन २०२२

## भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित व संख्याशास्त्र व इतर विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत

## सर्वसाधारण सूचना....

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात कोविड -१९ विषाणूच्या प्रादूर्भावाच्या परिस्थितीत शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह मर्यादित कालावधीसाठी कार्यान्वित आहेत. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत सर्व प्रात्यक्षिके पूर्ण करणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- विषय निहाय आराखडयाप्रमाणे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने किमान ४०% प्रात्यक्षिके पूर्ण करणे आवश्यक आहे.
- प्रात्यक्षिकांची निवड संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षक करतील व त्याची माहिती विद्यार्थ्यांना देतील.
- ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात उपरोक्त निर्धारित किमान प्रात्यक्षिकांपेक्षा जास्त प्रात्यक्षिके पूर्ण केलेली आहेत, त्यांनी पूर्ण केलेल्या प्रात्यक्षिकांपैकी आराखडयात सुचविल्यानुसार प्रात्यक्षिकांची परीक्षेसाठी निवड करावी. याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करावे.
- उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने निवडलेल्या व विद्यार्थ्यांनी अभ्यासलेल्या प्रात्यक्षिकांवर आधारितच परीक्षा घेण्यात यावी.
- विषय निहाय आराखडयाप्रमाणे विद्यार्थ्यांनी अभ्यासलेली प्रात्यक्षिके पूर्ण करून घ्यावीत व प्रात्यक्षिक वही (जर्नल) प्रमाणित (Certify) करावी.
- PCMB विषयांव्यतिरिक्त प्रात्यक्षिक परीक्षा असणा-या इतर विषयांकरिता विषयनिहाय आराखडा विचारात घेऊन किमान ४०% प्रात्यक्षिके घ्यावीत व त्यावर आधारित उपरोक्त सूचना विचारात घेऊन आराखडयानुसार प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी.
- भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित व संख्याशास्त्र (PCMB) या विषयांचा प्रात्यक्षिक परिक्षांचा आराखडा खालीलप्रमाणे आहे.

५. प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करताना कोविड-१९ च्या प्रादूर्भावासंदर्भातील सूचनांचे पालन करण्याच्या दृष्टिने उपलब्ध जागेचा विचार करून विद्यार्थ्यांच्या बॅचेस तयार कराव्यात.

६. विद्यार्थ्यांना व अन्य घटकांना कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देताना त्यांचे तापमान मोजण्यात यावे तसेच महाविद्यालयातील संपूर्ण कालावधीत विद्यार्थी व सर्व संबंधितांनी मास्क वापरणे अनिवार्य राहील.

७. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घ्यावी. आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करावे.

८. प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी परीक्षा दालनात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती काळजी घ्यावी.

------------------------****------------------------

(42)

# विषय : भौतिकशास्त्र (५४)

## वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन:

वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षा ही एक दीर्घ प्रयोग (Long Experiment), एक लघु प्रयोग (Short Experiment) व एक कृती (Activity) यावर घेण्यात यावी.

विषयनिहाय आराखडयानूसार खालीलेप्रमाणे गुणदान करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| १. एक दीर्घ प्रयोग(Long Experiment) | – | (१० गुण) |
| २. एक लघु प्रयोग(Short Experiment) | – | (०५ गुण) |
| ३. एक कृती (Activity) | – | (०५ गुण) |
| ४. प्रमाणित प्रात्यक्षिक वही (Certified Journal) | – | (०५ गुण) |
| ५. मौखिक परीक्षा (oral Examination) | – | (०५ गुण) |
| | एकूण गुण | ३० गुण |

२/५

## विषय : रसायनशास्त्र (५५)

वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन:

रसायनशास्त्र विषयाकरिता प्रात्यक्षिक परीक्षेच्या मूल्यमापन आराखडयानुसार खालीलप्रमाणे प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १. | a) प्रमाणित प्रयोगवही (Certified Journal) | (०५ गुण) |
| | b) मौखिक परीक्षा (Viva Voce) | (०५ गुण) |
| प्रश्न २. | Volumetric Analysis | (१० गुण) |
| प्रश्न ३. | Chemical Kinetics/ /Electrochemistry /Detection of two basic radicals | (१० गुण) |

**OR (किंवा)**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न ३. | a) Thermochemistry/ Detection of two acidic radicals/ Preparation of one inorganic compound/ Preparation of one organic compound- | (०६ गुण) |
| | b) Activity | (०४ गुण) |
| | एकूण | ३० गुण |

# विषय : जीवशास्त्र (५६)

**वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन:**

जीवशास्त्र विषयाकरिता खालील आराखडयानुसार प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन गुणदान करण्यात यावे.

A) मुख्य प्रयोग ( Major Experiment ) कोणताही एक प्रयोग (०४ गुण)

B) उपप्रयोग ( Minor Experiment ) कोणताही एक प्रयोग (०३ गुण)

C) उपप्रयोग ( Minor Experiment ) कोणताही एक प्रयोग (०३ गुण)

D) Spotting Experiments ( A To J )

A To F पैकी कोणतेही दोन आणि G To J पैकी कोणतेही दोन असे एकूण चार Spots, प्रत्येक spotting ला २.५ गुण (१० गुण)

From A to F any two and G to J any two. Total Four Spots. Each carrying weightage of 2. 5 marks

E) प्रकल्प ( Project ) (०५ गुण)

F) मौखिक परीक्षा ( Viva Voce ) (०२ गुण)

G) प्रयोग वही ( Journal ) (०३ गुण)

एकूण ३० गुण

# विषय : गणित व संख्याशास्त्र (कला व शास्त्र ४०) (वाणिज्य ८८)

वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन:

भाग १ व भाग २ च्या प्रत्येकी किमान् तीन प्रात्यक्षिकांची निवड करावी. प्रश्नपत्रिकेच्या आराखडयानूसार, घेतलेल्या प्रात्यक्षिकांतील भाग १ व भाग २ मधून प्रत्येकी दोन प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांने या चार प्रश्नांपैकी तीन प्रश्न सोडवावेत. पाच गुण प्रमाणित केलेल्या प्रात्यक्षिक वही/जर्नलला असतील.

विषयनिहाय आराखडयानूसार खालीलप्रमाणे गुणदान करण्यात यावे.

१) गणित भाग-१ चे किमान तीन व भाग-२ चे किमान तीन प्रात्यक्षिकें लिहिलेली प्रमाणित प्रयोगवही (Certified Journal) (०५ गुण)

२) गणित भाग-१ मधून दोन व भाग-२ मधून दोन प्रश्नांपैकी कोणतेही तीन प्रश्न सोडविणे (प्रत्येकी पाच गुण) (१५ गुण)

---------

एकूण २० गुण

----------

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी) परीक्षा मार्च - २०२२
## एन.एस.क्यू.एफ अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा विषय
## (E3, E5, E6, F6, F8 व G1 ते G 6, G8,G 9 )

१) व्यवसाय शिक्षण अंतर्गत विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, प्रचलित पध्दतीने घेण्यात याव्यात. मात्र कोविड १९ विषानुचा प्रादुर्भाव विचारत घेवुन प्रात्यक्षिक परीक्षाचे नियोजन खालीलप्रमाणे करावे.

| नियमित मुल्यांकन पध्दत | प्रात्यक्षिक परीक्षेस दोन्ही टर्म मध्ये अनुपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्च - २०२२ साठी मुल्यांकन पध्दत |
|---|---|
| • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये | • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये |
| • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>---<br>➢ प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>---<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे-<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>• ---<br>• अंतर्गत - २० गुण<br>---<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>---<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण | • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>➢ प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुण<br>( २५ टक्के कमी केलेली प्रात्यक्षिके वगळून उरलेल्या प्रात्यक्षिकांपैकी किमान ६ प्रात्यक्षिकांचा सराव घेऊन त्यावर आधारित ३० गुणांचे एक प्रात्यक्षिक घेण्यात यावे.)<br>अंतर्गत गुण खालीलप्रमाणे:<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>---<br>अंतर्गत - २० गुण<br>---<br>[illegible]<br>---<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण |

२) NSQF अंतर्गत मान्यताप्राप्त विषय (E3,E5,E6,F6, F8 व G1 ते G 6,G 8,G 9 ) प्रात्यक्षिक परीक्षा मार्च-२०२२ साठी उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर अंतर्गत परीक्षकाची नियुक्ती करण्यात यावी. वहिस्थ परीक्षक सेक्टर स्किल मार्फत नियुक्त केले जातील.

३) विद्यार्थ्यांने जमा केलेले टर्म वर्क, प्रकल्प,प्रात्याक्षिक इत्यादीची तपासणी करून ते नोंदीसह शालेय दप्तरी जतन करून ठेवावे.

४) विद्यार्थीनिहाय टर्म वर्क ,प्रकल्प व प्रात्यक्षिक यांची तपासणी करून त्याच्या गुणांच्या नोंदी मंडळाने पुरविलेल्या गुणपत्रिकेत (OMR SHEET) करावी.

५) पुनर्परीक्षार्थींसाठी देखील निर्धारित विषयांच्या प्रात्यक्षिकाबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

विषय - (E3,E5,E6,F6, F8 व G1 ते G 6,G 8,G 9)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा मार्च २०२२

## आरोग्य व शारीरिक शिक्षण विषय लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कार्य

**या विषयाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा नवीन मूल्यमापन आराखडयानुसार होईल.**
सदर विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व लेखी परीक्षा मूल्यांकन इ. घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना राहिल.

| नियमित मूल्यांकन पध्दत | मार्च २०२२ साठी मूल्यांकन पध्दत |
|---|---|
| लेखी परीक्षा = २५ गुण(द्विवतीय सत्रात अनिवार्य ) | लेखी परीक्षा = २५ गुण(द्विवतीय सत्रात अनिवार्य ) नवीन अभ्यासक्रमावर आधारित |
| प्रात्यक्षिक परीक्षा = २५ गुण<br><br>प्रात्यक्षिक १.आरोग्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता(गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक २. कौशल्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ३. उपलब्ध असलेल्या सांघिक खेळापैकी एका खेळाची निवड करुन क्री डा कौशल्य सादरीकरण घेणे. (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ४. योग व प्राणायम (गुण ५)<br>दोन आसने (प्रत्येकी २ गुण)<br>प्राणायम -(१ गुण)<br><br>५. विविध क्री डा स्पर्धेतील सहभाग /तासिका उपस्थिती /पुस्तक लेखन कार्य (गुण ५) | प्रात्यक्षिक परीक्षा = २५ गुण<br><br>प्रात्यक्षिक १.आरोग्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता(गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक २. कौशल्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ३. विद्यार्थी पारंगत असलेल्या खेळाची अथवा उपलब्ध असलेल्या सांघिक खेळापैकी एका खेळाची निवड करुन क्री डा कौशल्य सादरीकरण घेणे. (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ४. योग व प्राणायम (गुण ५)<br>दोन आसने (प्रत्येकी २ गुण)<br>प्राणायम -(१ गुण)<br><br>५. विविध क्री डा स्पर्धेतील सहभाग /तासिका उपस्थिती /पुस्तक लेखन कार्य (गुण ५) |

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाची परिस्थिती पाहून निर्धारित अभ्यासक्रमात असलेल्या क्षमतांमध्ये साधार्म्य असलेल्या क्षमता वापरून मूल्यांकन करण्याचे स्वातंत्र्य कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर राहील.

लेखी परीक्षा २५ गुण + प्रात्यक्षिक परीक्षा २५ गुण असे एकूण ५० गुणांपैकी मिळालेल्या गुणांचे श्रेणीत रुपांतर करण्यात यावे.

मार्गदर्शक सूचना - कोविड-१९ ची परिस्थिती पाहता कमीत कमी विद्यार्थ्यांच्या बॅचेस करुन शारीरिक अंतर ठेवून गटागटाने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात. कॉमन साहित्याचा वापर टाळून वैयक्तिक स्वरुपाच्या क्षमता प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारे शक्य होईल ते साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणण्याचा प्रयत्न करावा. उदा. स्किपिंग रोप, योगा मॅट/सतरंजी इ.